Vol 4 Issue 3 Dec 2014

ISSN No : 2249-894X

## Monthly Multidisciplinary Research Journal

# Review Of Research Journal

Chief Editors

**Ashok Yakkaldevi**
**A R Burla College, India**

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

**Welcome to Review Of Research**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2249-894X**

Review Of Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial Board readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

***Advisory Board***

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Fabricio Moraes de AlmeidaFederal
University of Rondonia, Brazil

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Xiaohua Yang
University of San Francisco, San Francisco

Karina Xavier
Massachusetts Institute of Technology (MIT), USA

May Hongmei Gao
Kennesaw State University, USA

Marc Fetscherin
Rollins College, USA

Liu Chen
Beijing Foreign Studies University, China

Mabel Miao
Center for China and Globalization, China

Ruth Wolf
University Walla, Israel

Jie Hao
University of Sydney, Australia

Pei-Shan Kao Andrea
University of Essex, United Kingdom

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Ilie Pintea
Spiru Haret University, Romania

Mahdi Moharrampour
Islamic Azad University buinzahra Branch, Qazvin, Iran

Titus Pop
PhD, Partium Christian University, Oradea,
Romania

J. K. VIJAYAKUMAR
King Abdullah University of Science & Technology,Saudi Arabia.

George - Calin SERITAN
Postdoctoral Researcher
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences
Al. I. Cuza University, Iasi

REZA KAFIPOUR
Shiraz University of Medical Sciences
Shiraz, Iran

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

Nimita Khanna
Director, Isara Institute of Management, New Delhi

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University, Kolhapur

P. Malyadri
Government Degree College, Tandur, A.P.

S. D. Sindkhedkar
PSGVP Mandal's Arts, Science and Commerce College, Shahada [ M.S. ]

Anurag Misra
DBS College, Kanpur

C. D. Balaji
Panimalar Engineering College, Chennai

Bhavana vivek patole
PhD, Elphinstone college mumbai-32

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary, Play India Play (Trust),Meerut (U.P.)

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Sonal Singh
Vikram University, Ujjain

Jayashree Patil-Dake
MBA Department of Badruka College Commerce and Arts Post Graduate Centre (BCCAPGC),Kachiguda, Hyderabad

Maj. Dr. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

AR. SARAVANAKUMARALAGAPPA
UNIVERSITY, KARAIKUDI,TN

V.MAHALAKSHMI
Dean, Panimalar Engineering College

S.KANNAN
Ph.D , Annamalai University

Kanwar Dinesh Singh
Dept.English, Government Postgraduate College , solan

More.........

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.ror.isrj.org**

Review Of Research
Vol. 4 | Issue. 3 | Dec. 2014
Impact Factor : 2.1002 (UIF)
ISSN:-2249-894X
Available online at www.ror.isrj.org

ORIGINAL ARTICLE

# भारतात स्थायिक झालेले प्रमुख विदेशी वसाहतकार – एक दृष्टीक्षेप

**Gopinath B. Sarang**

HOD of History,I.C.S College, Khed
Dist.- Ratnagiri, Maharashtra.

*सारांश* :

भारताच्या विविध भागांतून रहाणा-या स्थानिक लोकांशिवाय, भारताच्या बाहेरुन येउन देखील लोकांनी भारतामध्ये वस्ती केली होती ते या देशाचे रहीवासी बनले होते नाशिक आणि कार्ले लेण्यांमधील आलेखांमध्ये यवन आणि शक यांनी दिलेल्या दानाचे उल्लेख आहेत.1 ते महाराष्ट्रामध्ये रहात होते आणि बहुतकरुन त्यानी त्याचा धर्म म्हणून बौद्ध धर्माचा स्विकार केला होता. सर्वात महत्वाचे म्हणजे विदेशी राज्यकर्ते शक–क्षत्रप हे भारतात सत्ता गाजवित होते. अशाच विदेशातून भारतात स्थायिक झालेल्यांवर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न या लेखातून केला आहे.

## *प्रस्तावना* :

### *1.ग्रीक, रोमण आणि खिश्चनः*

इतिहास काळाच्या सुरुवातीला कोकणात पर्यायाने भारतात ग्रीक व रोमण व्यापारी दिसून येतात. टॉलेमी, स्ट्रॅबो यांच्या लिखानाबरोबरच 'पेरिप्लस ऑफ द एरिथ्रियन सी' या अदभूत आणि अनामिक ग्रंथात कोकण किणारा व त्यावरील बंदरे–व्यापारी पेठा यांचा स्पष्ट उल्लेख आहे. भडोच, सोपारा, कल्याण अशी नावे आहेत व या बंदराचा पैठण व तगर म्हणजे मराठवाडयातील तेर या पेठांशी मोठा व्यापार असल्याचे दिसते. या बंदरापैकी काही ठिकाणी तरी या ग्रीक व रोमण व्यापा-याच्या लहन मोठया वसाहती असाव्यात असा अंदाज बाधंण्यास जागा आहे. तीन चार शतके व्यापाराच्या निमित्ताने जा–ये चालू होती, तिला काहीसे स्थैर्य आणण्यासाठी अशा वसाहती असणे स्वाभाविक दिसते. पश्चिम महाराष्ट्रातील काही ठिकाणच्या शिलालेखातून रोमन व्यापारी व धनिक यांनी बौद्ध विहांरासाठी दानधर्म केल्याचे उल्लेख आहेत. त्यामुळे या अंदाजास पुष्टीच मिळते. कोकण किनारपट्टीवरही पाश्चिमात्यांच्या विशेषतः ग्रीकाच्या वसाहती होत्या. एशियाटिक रिसर्चेसच्या दहाव्या खंडात पृष्ठ 144, कल्याणमध्ये ग्रीक लोकांची वसाहत होती, असा उल्लेख विल्फोडने केला आहे.2

सहाव्या शतकाच्या सुरुवातीला इतिप्तमधील खिश्चन व्यापारी व धर्मगुरु कॉसमॉस इन्डिकोप्लेस्टेस याने ठाणे व कल्याण बंदरांची माहिती दिली आहे. कल्याणला इतर बंदरपेक्षा जास्त महत्व प्राप्त झालेले दिसून येते. येथून दक्षिणेस श्रीलंकेपर्यत व पश्चिमेस इराणच्या आखातातील हीरा व ओबोला या बंदरापर्यत व्यापार चालत असल्याची नोंद कॉसमॉसने केली आहे. कल्याण व सोपा-यात खिस्ती लोकांच्या वसाहती होत्या, याचाही त्याने उल्लेख केलेला आहे.3

प्राचीन काळी कोकण हे भारताच्या पश्चिम किना-याचा भाग होता, ज्याची ग्रीक आणि रोमन व्यापा-याना चांगली माहिती होती. जे बरेच वर्षे सोपारा, चेउल इत्यादी प्राचीन बंदरे आणि व्यापारी शहरांशी व्यापार करीत होते. टॉलेमीच्या मतानुसार कान्हेरी, नाशिक, कार्ले आणि जुन्नर लेण्यांसाठी यवनानी देणगी दिली होती. ज्यावरुन काही ग्रीक लोक देशात स्थायिक होउन त्यानी बौद्ध धर्म स्वीकाल्याचे दिसते4इ.स.पहिल्या शतकानंतर खिस्त डायओसिअस ;बेतपेज क्पवदलेपनेद्ध या हुशार माणसाला खिश्चन मिशनरी म्हणून इजिप्त मधून भारतात पाठविले आणि सातवाहन, ब्राम्हण

आणि बौद्ध यांची पहिल्यांदा स्पष्ट माहिती घेतली. उलटपक्षी आपणाला असे आढळते की, पहिल्या शतकाच्या पूर्वीही अलेक्झाड्रियात भारतीय ख्रिश्चन स्थायिक झाले होते. प्लीनी काळातही अनेक भारतीय इजिप्तमध्ये रहात होते. यावरुन भारत आणि इजिप्त त्याच प्रमाणे भारत आणि ग्रीक यांच्यात सततचे संबंध होते असेच दिसते.

## *2.बेनी–इस्त्रायल* (Bani-Israi) : ज्यू

बेनी–इस्त्रायल किंवा ज्यू लोक मुख्यत्वेकरुन समुद्रालगतच्या भूभागात आढळतात. त्याच्या स्वतःच्याच कथेनुसार ते मुळचे देशांतर करणा-याचे वंशज आहेत. त्यांची देशी सैन्यामध्ये भरती झालेल्याची संख्या विचारात घेण्यासारखी होती, व त्यांनी सैनिक म्हणून प्रशंसा मिळविली होती. ते जुन्या कराराचा प्रामाणिकपणे स्वीकार करतात. त्याची घरगुती भाषा मराठी आहे. पण उपासनास्थानात ;लदंहवनमेद्ध त्यांची भाषा आणि वाचन हिब्रूमध्ये होते.

बेने इस्त्राएल या शब्दाचा अर्थ बेन ए इस्त्राएल म्हणजे इस्त्राएलची मुले असा आहे. त्यांना ज्यू, यहुदी अथवा शनवार तेली असेही म्हणतात. पूर्वी तेल गाळण्याचा प्रमुख व्यवसाय ते शनिवारी बंद ठेवीत म्हणून त्यांना शनवार तेली असे म्हणत. त्याचे मूळस्थान आणि भारतातील वास्तव्य याविषयी ऐतिहासिक पुरावे नाहीत. तथापि, ते एडन अगर पर्शियन गल्फमधून इ.स. च्या सहाव्या शतकात भारतात आले असावेत असे दिसते.5 आपल्या आगमनाविषयीच्या आख्यायिके अनुसार त्यांच्या दोन जहाजांपैकी एक जहाज कोचीन बंदरात लागले. त्यांनी तेथे वस्ती केली तर दुसरे जहाज अलिबाग तालुक्यातील थळच्या उत्तरेस नवेदर नवगाव येथे आले. वाचलेल्या स्त्री–पुरुषांनी अलिबाग, रोहा, मुरुड, पेण व पनवेल तालुक्यांत हळूहळू स्थलांतर केले. परदेशातून आलेल्या मूळ लोकांचे वंशज ते गोरे व स्थानिक स्त्रियांपासून जन्मलेले आणि धर्मांतरित झालेले ते काळे असे त्यांच्यात दोन सामाजिक पोटभेद झाले. यांचा धर्म व चालीरिती एकच असल्या तरी त्यांच्यात रोटीबेटी व्यवहार होत नाहीत.

हे लोक यहुदी धर्माचे अनुयायी असून एकाच देवाला भजतात. परंतु त्याची प्रतिमा नसते. त्यांच्या प्रार्थना मंदिराला सिनगॉग असे नांव असून त्यात जुन्या कराराच्या प्रती ठेवलेल्या असतात व त्यांना पवित्र मानतात. अलिबाग, आंबेपूर व रेवदंडा, अष्टमी ;रोहाद्ध, बोर्लाई (मुरुड) पेण आणि पनवेल या कोकणच्या भागात त्याची प्रार्थनास्थळे आहेत. ती बाहेरुन मशिदीसारखी दिसतात.

हे लोक धर्मप्रसार करीत नाहीत. रोश, हशण, दारफळणी, पुरिम व तिशबेअब हे सण साजरे करतात. रोश शहण सणाचे दिवशी ते घरात राहतात व बाहेरच्या माणसाशी बोलत नाहीत. पुरिम हा सण हिंदूच्या होळीच्या दिवशी असतो. जुलै–ऑगस्ट महिन्यात येणा-या तिशबेअब सणाला मोडाचे बिरडे आहारात असते. म्हणून यास बिरडयाचा सण असेही म्हणतात.

## *3.मुसलमानः*

पूर्वीपासून महाराष्ट्रातील कोकण विभागात स्थायिक झालेला मुसलमान समाज आजही कोकणी मुसलमान या नावाने प्रसिद्ध आहे. आणि कोकणी हीच आपली बोली भाषा आहे असे तो अभिमानाने सांगतो.6

रायगड जिल्हयात सुन्नी पंथाचे मुसलमान मोठया प्रमाणात आढळतात. कोकणी व दालदी इ. स. 700च्या सुमारास युफ्रेटीस खो-यातून इकडे आले असावे. दहाव्या शतकात चौल येथे अरब व पर्शियान मुसलमान मोठया प्रमाणावर स्थायिक झाले. परदेशातून आलेल्या व्यक्तींनी स्थानिक महिलांशी लग्न केल्यामुळे तसेच काही हिंदूनी धर्मातर केल्यामुळे मुस्लिम धर्मियांची लोकसंख्या वाढली. त्यांची बरीच आडनावेही हिंदूप्रमाणेच आहेत. उपजीविकेसाठीही काही मुसलमान खदीक, शिल्प कारागीर रायगड जिल्हयात येउन स्थायिक झाले. मुसलमानामधे कोकणी किंवाजमाती मुसलमान, दालदी, बोहोरा, मेमण, खोजा, कसाई अशा जमाती आढळतात.

## *4.पारशीः7*

जगाच्या पाठीवर आज जे धार्मिक समुदाय आहेत त्यात पारशी समाज हा अत्यंत अल्प संख्येत आढळतो. हा समाज फक्त भारतातच तग धरुन आहे पर्शियातील ससानियन राजवटीच्या अस्तानंतर त्या समाजाची वाताहात झाली. निर्वासित होउन ते देश सोडून पळाले आणि जगात विखुरले.

इजिप्शीयन व्यापारी आणि संन्यासी कॉसमॉस इंडिकोप्लेस्टेस याच्या वर्णना प्रमाणे सन 525ला कल्याण हे शहर अत्यंत भरभराटीचे असून तेथे हिंदू, अरब, पार्शियन आणि पर्शियन ख्रिश्चनांची समुद्रात मोठी वर्दळ होती. तसेच कल्याण ख्रिश्चन पीठ होते. याचा अर्थ कल्याण शहर व परिसर हा सर्व धर्मियांना ज्ञात व वसती योग्य वाटत होता. तो जसा अरबांना ज्ञात होता तसाच पर्शियनाना, पर्यायाने पारशानाही चांगला ज्ञात होता. पर्शियन राजा नौशेखान (531. 578) यांच्या काळात पर्शियाशी ठाणे जिल्हयाचे व्यापारी, राजकीय व धार्मिक संबंध अत्यंत जिव्हाळयाचे आढळतात. सन 641ला येझ्देझार्ड राजवट संपुष्टात आली. पारशी धर्माच्या सर्व खाणाखुणा अरबानी उध्वस्त केला. त्यानंतर पारशी समाजाचा एक जथ्था सन 766ला भारताच्या किना-यावर प्रथम दिव बेटात निर्वासित म्हणून आला. मुळ संस्कृत शब्द व्दिप ही पारशाची भारतातील पहिली वसाहत होय. पुढे 19वर्षानी म्हणजे सन 785ला त्यानी दिव ही सोडले. त्यानंतर

श्रावण शुद्ध 13, शके 707, सन 785 या दिवशी दमण पासून 25 मैलावर संजाण येथे आले. तो दिवस आजही पारशी समाज यझ्‌देझार्डी तारीख म्हणून साजरा करतात.

कान्हेरी येथे सन 02 डिसेंबर 999 आणि 05 नोव्हेबर 1021 असे दोन पहेलवी लेख आहेत. पहिल्या भेटीत 17 लोक होते. तर दुस-यात दहा होते. लेख व दाने देण्याइतपत पारशी श्रीमंत व भाविक होते. म्हणजेच ते व्यापारी वृत्ती, कायम ठेवून येथील प्रचलित धर्माशी संबंध ठेवत होते. हे सिद्ध होते. चिंचणी येथील सन 926च्या ताम्रपटात अरबानी संजाणवर ताबा मिळविल्याचे आढळते, अर्थात हा अरब राष्ट्रकुटांचा मांडलिक होता.

त्या पूर्वी दहा वर्षे आधी सन 916ला मसुदी हा प्रवाशी चौलला हजारोंच्या संखेत अरब व पार्शियन पाहिल्याचे नमूद करतो. याचा अर्थ सन 785 ला संजाणला आल्यावर हे पारशी संजाणच्या दक्षिणेला 150 मैलांवर चौल पर्यत वसाहत करते झाले होते. त्यांचा 130वर्षात हा हजारोंनी प्रवास झाला ते असे दर्शविणारे आहे की, व्यापारी वृत्ती, निशस्त्रीकरण आणि येथील राजवटींशी मैत्रीपूर्ण संबध हयातून हा प्रवास झाला हे निश्चित. अर्थात सरळ संजाणहून थेट चौलला गेले असतील असेही म्हणता येणार नाही तर त्या सुमारास व्यापारास उपयुक्त असणा-या ठाणे–कल्याण भागातही ते विखुरले असणार.

### *5.अरब :*

चवथ्या–पाचव्या शतकापासून पुढे ग्रीक–रोमन व्यापा-याच्या ऐवजी अरब व्यापारी भारतात येवू लागले. त्यानी इथे वस्त्या केल्या. पुढे अरबस्तानात इस्लामाचा प्रसार झाल्यावर त्यानी त्या धर्माचा स्वीकार केला. सातव्या–आठव्या शतकात भडोच, दाभोळ व ठाणे या बंदरावर काही अरबानी नाविक हल्ले केले. परंतु खलिफा उमर याने अशा मोहीमांवर बंदी घातली. अशी बंदी घालण्यामागे त्यांच्या व्यापारावर अनिष्ट परीणाम होण्याची भिती असावी. अरबानी या ठिकाणी प्रतिष्ठा प्राप्त केली. राष्ट्रकूट, यादव या राजानी त्यांना प्रशासनात अधिकारपदे दिली. ते सर्वार्थाने कोकणात स्थायिक झाले. विशेष म्हणजे अरब सहयाद्रीच्या रांगा ओलांडून देशभागाकडे गेले नाहीत.8

### *संदर्भ*

1.B. G., Vol- XI, p-137.
2दळवी, प्राचीन कोकणातील बंदरे व व्यापार, पृ. 29–33.
3.बॉम्बे गॅझेटिअर : ठाणे जिल्हा, पृ. 419
4.B. G. Vol. XI, p. 137.
5.भालचंद्र आकलेकर, कोकणचा सांस्कृतिक इतिहास, पृ. 202–203
6.Dalvi M. A., Kokani Musalman Samaj, Pune, 1999.
7.साठे श्रीनिवास द., कोकणच्या इतिहासावरील चर्चासत्र, रत्नागिरी, 2003, पृ. 40 ते 44.
8.माटे म. श्री., कोकणच्या इतिहासावरील चर्चासत्र, रत्नागिरी, 2003, पृ. 1ते 9.

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal
# For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Books Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- Directory Of Research Journal Indexing
- International Scientific Journal Consortium Scientific
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- DOAJ
- EBSCO
- Crossref DOI
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database

Review Of Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.ror.isrj.org